**सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये राज्य ई-गव्हर्नन्स कार्यक्रम राबविण्यास सुधारित प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: ई-गव्ह -२०२५/प्र.क्र.१२३/१३-अे**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०२ एप्रिल, २०२६

**संदर्भ-** १) सामान्य प्रशासन विभाग यांचा शासन निर्णय क्र.GADIT ०८०/४/२०१४-O/O DIRECTORATE of IT-DIT(MH) दि.०५.१०.२०२३
२) शासन निर्णय क्रमांक: ई-गव्ह -२०२५/प्र.क्र.१२३/१३-अे, दि.२५.०६.२०२५
३) शासन निर्णय क्रमांक: ई-गव्ह -२०२५/प्र.क्र.१२३/१३-अे, दि.२२.०७.२०२५
४) शासन निर्णय क्रमांक: ई-गव्ह -२०२५/प्र.क्र.१२३/१३-अे, दि.१०.१२.२०२५
५) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे यांचे क्र./कृआ/सं.प्र./ई-गव्ह (२५-२६)/निधी मागणी/२७९/२०२६, दि. २३.०३.२०२६.

**प्रस्तावना:-**

कृषि व पदुम विभागाचे (खुद्द) मंत्रालय तसेच कृषि आयुक्तालय व अखत्यारितील व र्यालयांचे संगणकीकरण बळकटीकरण व्हावे यासाठी राज्य ई-गव्हर्नन्स कार्यक्रम ही योजना र' विण्यात येते. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग (खुद्द) व कृषि आयुक्तालयामाफत ई-गव्हर्नन्स कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येतात, तसेच विविध उपक्रमांचे नियोजन करण्यात येते. सदर योजनेंतर्गत राज्य शासनातर्फे दरवर्षी ठराविक रक्कम मंजूर करण्यात येते सदर मंजूर झालेली रक्कम कृषि विभाग (खुद्द) तसेच कृषि आयुक्तालय, पुणे यांना आवश्यकतेर विभागून वितरीत करण्यात येते.

ई-गव्हर्नन्स कार्यक्रम ही योजनांतर्गत योजना आहे. सन २०२५-२६ वा वित्तीय वर्षामध्ये सदर योजनेसाठी (३४५१ २७८२) एकूण रुपये १००.०० कोटी निधी अर्थसंकल्पित कलेला आहे. सन २०२५-२०२६ करिता राज्य ई-गव्हर्नन्स योजना राबविण्याकरिता योजनेमध्ये दि. २५.०६.२०२५ च्या शासन निर्णयान्वये रु. २५.१२९८ कोटी व दि. १०.१२.२०२५ च्या शासन निर्णयान्वये र १.५४८८ कोटी अशा एकूण रु. २६.६७८६ कोटी निधीस प्रशासकीय मान्यता आहे. त्यापैकी दि. २२.०७.२०२५ च्या शासन निर्णयान्वये रु. १५.८४९३ कोटी व दि. १०.१२.२०२५ च्या शासन निर्णयान्वये रक्कम रु. ०.३८७२ कोटी असे एकूण राज्य ई-गव्हर्नन्स योजनेंतर्गत रु.१६.२३६५ कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. राज्य ई-गव्हर्नन्स योजनेंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी सर्व बाबींसाठी माहे मार्च २०२६ पर्यंत रक्कम रु. ५.११७९ कोटी निधी आवश्यक आहे.

राज्य ई-गव्हर्नन्स योजनेंतर्गत कृषि आयुक्तालय स्तरावरून महाआयटी, मुंबई यांचेकडून नियुक्त मनुष्यबळ यांचे सेवाशुल्क, महाॲग्रीटेक प्रकल्प अंतर्गत सेवाशुल्क, विविध ॲप्लीकेशनसाठीचे क्लाउड सुविधा, हार्डवेअर खरेदी, कृषि आयुक्तालयातील सर्व कार्यासनांसाठी इंटरनेट सेवा, कनेक्टिव्हिटी, आयटी उपकरणे देखभाल दुरुस्ती यासारख्या अत्यावश्यक सेवा सुविधांवर खर्च होतो.

कृषि व पदुम विभागाचा शासन नि.क्र.ई-गव्ह-२०२५/प्र.क्र.१२३/१३-अे दि.२५.०६.२०२५ अन्वये प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर उपरोक्त बाबींची देयके अदा करण्याचे कळविण्यात आल्याने प्रशासकीय मान्यतेच्या शासन निर्णयामध्ये काही बाबी समाविष्ट नसल्याचे कृषि आयुक्तालयाने कळविले होते.

सदर बाबींची देयके अखंडीत सेवा सुविधेसाठी तात्काळ अदा करणे आवश्यक असल्याने कृषि आयुक्तालयाने निधी उपलब्ध असलेल्या बाबीमधून त्यांची देयके अदा केल्याने सदर बाबीमध्ये प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधिक खर्च झाला असल्याचे कृषि आयुक्तालायमार्फत कळविण्यात आले होते. तरी सदर वाढीव बाबींना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**<u>शासन निर्णयः-</u>**

१. सन २०२५-२६ या वित्तीय वर्षामध्ये राज्य ई-गव्हर्नन्स कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याकरिता वाढीव बाबींना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदर सुधारित प्रशासकीय मान्यतेचा बाबनिहाय तपशील पुढीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे:-

**(रु. लाखात)**

| **अ.क्र.** | **खर्चाची बाब** | **सुधारित प्रशासकीय मान्यता द्यावयाचा निधी** |
|---|---|---|
| १ | कृषी विभागाच्या आज्ञावली करिता Cloud व्यवस्थापन, security audit, SSL प्रमाणपत्रे ई संदर्भात सेवाशुल्क अदा करणे. | ८.४० |
| २ | महाडीबीटी पोर्टलसाठी पुणे मुख्यालयी दोन बिझनेस ॲनालिस्ट नियुक्त करणेबाबत | ९.६५ |
| ३ | आय टी सल्लागार तांत्रिक मनुष्यबळ सेवा | २०३.४० |
| ४ | ॲग्रीस्टॅक प्रकल्पासाठी ESDS Software Solution Ltd. यांची क्लाउड सेवेचे देयके | ६४.४२ |
| | **एकूण** | **२८५.८७** |

२. या शासन निर्णयान्वये कृषि विभागांतर्गत ई-गव्हर्नन्स कार्यक्रमाकरिता वितरीत करण्यात येणारा निधी पुढील लेखाशिर्षांतर्गत सन २०२५-२६ करिता अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या तरतुदीतुन खर्ची टाकावा :-

"मागणी क्र. डी-७
३४५१ सचिवालय- आर्थिक सेवा,
पंचवार्षिक योजनांतर्गत योजना
(०२) योजना

(०२) (०४) ई-गव्हर्नन्स कार्यक्रम अंमलबजावणी

(कृषि) (३४५१ २७८२), १७ संगणक खर्च

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०४०२१२३७५७०६०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

LALITKUMAR
RANGNATH
DHAYGUDE

Digitally signed by LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and Adf Dept,
2.5.4.20=77EE43FEB646B7AE43865425CA1D67A75CD7607FAEAE62A4E9BAD488155D6D28, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=84E88A84C7D5FA8833BA5D3A151CAF394D94599C220A07BDD761A398EED0AC3E, cn=LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE
Date: 2026.04.02 12:40:05 +05'30'

**( डॉ. ललितकुमार धायगुडे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति-**

१) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम(सार्वजनिक उपक्रम)), महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
३) मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन, राज्य उत्पादन शुल्क), महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.मंत्री(कृषि), मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
५) मा.राज्यमंत्री(कृषि), मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
६) मा.विरोधी पक्षनेता विधानसभा/विधान परिषद, विधान भवन, मुंबई
७) सर्व मा.संसद सदस्य/महाराष्ट्र विधानसभा सदस्य/महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य
८) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९) अपर मुख्य सचिव(वित्त), मंत्रालय, मुंबई
१०) प्रधान सचिव(कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
११) आयुक्त(कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे
१२) सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे
१३) प्रधान महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा) मुंबई / नागपूर.
१४) वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
१५) संचालक, लेखा व कोषागारे मुंबई/अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
१६) सहसंचालक, लेखा व कोषागारे, मुंबई/अधिदान व लेखा अधिकारी मुंबई
१७) सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय मुंबई.
१८) सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे
१९) निवड नस्ती-१३-अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय. मुंबई.